# <u>नियमित दिवाणी दावा क्रमांक १६५/२०२३ मधील नि.क्र.२७ वरील आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज, वादीने मयत प्रतिवादी महादेव शिदु घार्गे यांच्याविरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रदद करुन मयताचे वारस अभिलेखावर घेण्याकरीता दाखल केलेला आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी हे दिनांक १९.०८.२०२३ रोजी मयत झाले आहेत. ते मयत झाल्याची बाब वादीला नुकतीच समजली आहे. त्यांचे पश्चात दावा चालविण्याचा त्यांचे वारसांचा कायदेशीर हक्क असल्याने दाव्याकामी त्यांचे वारस अभिलेखावर घेणे अत्यंत गरजेचे व आवश्यक आहे. वादी यांना प्रतिवादी कोठे मयत झाले याची माहिती नसल्याने मृत्युचा उतारा वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे सदरचा दावा त्यांचेविरुध्द अबेट झाला आहे. दाव्यामध्ये कोणतीही तांत्रीक त्रुटी राहू नये याकरीता मयत प्रतिवादीविरुध्द अबेटमेंटचा आदेश रद्द करुन मयताचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. सबब वादीची विनंती आहे की, मयत प्रतिवादी विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रदद करण्यात यावा.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जास हरकत घेतली. प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार, अर्जात नमूद केलेले कारण योग्य व बरोबर नाही. वादी व प्रतिवादी हे एकाच गावात राहणारे आहेत. त्यामुळे मयत प्रतिवादीचा मृत्युचा उतारा त्यांना वेळेत उपलब्ध झाला असता. वादीने अर्जात नमूद केलेले कारण चुकीचे आहे. सबब अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा.

३. अर्जदारांचे कथनांवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांस त्यापुढे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी मागणी केल्यानुसार प्रतिवादीविरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करुन मिळण्यास पात्र आहे काय ? | होय. |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>का र ण मी मां सा</u>

४. वादी व प्रतिवादींचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द वादीच्या दावा मिळकतीमधील कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये व निरंतर ताकीदिसाठी दाखल केला आहे. अर्जामधील मजकुरावरुन प्रतिवादी महादेव शिदु घार्गे हे दिनांक १९.०८.२०२३ रोजी मयत झाले आहेत. दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादींच्या वारसांना दावा पुढे चालविण्याचा हक्क आहे. अभिलेखावरील वस्तुस्थिती लक्षात घेता सदरील अर्जामध्ये तथ्य असून वारस रेकॉर्डवर घेऊन दुरुस्ती होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे मुळ दाव्यात बदल होणार नाही अगर स्वरुपही बदलणार नाही. वारसांना त्यांच्या हक्काबाबत दावा पुढे चालविण्याचा अधिकार आहे. सबब केसमधील वाद मुद्दा गुणदोषावर निकाली होणेसाठी मयत प्रतिवादी यांचेविरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवून त्यांचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. सबब मुद्दा क्रमांक १ होकारार्थी देऊन मुद्दा क्रमांक २ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. मयत प्रतिवादी महादेव शिदु घार्गे याचेविरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रदद करण्यात येत आहे.

VAIBHAV BAJRANG GHADAGE
Digitally signed by VAIBHAV BAJRANG GHADAGE
Date: 2025.10.28 17:32:23 +0530

वडूज.
दिनांकः-२८.१०.२०२५

**( व्ही. बी. घाडगे )**
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, वडूज.